# महाराष्ट्र शासन

**तात्काळ**
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२६४८८
ई - मेल-ravindra.sawant84@nic.in

क्र.संकिर्ण-०८/२०१७/प्र.क्र.१२६/अ-२
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि.:- १० मे,२०१८.

प्रति,

१) विभागीय आयुक्त,कोकण / पुणे / नाशिक / अमरावती / नागपूर / औरंगाबाद विभाग.
२) सर्व जिल्हाधिकारी.

विषय:-भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम महाराष्ट्र राजपत्रात प्रसिद्ध केल्याबाबत.

महोदय,

केंद्र शासनाने " The Right to fair compensation and Transparency in land acquisition, Rehabilitation, Resettlement Act,२०१३ " हा नवीन भूसंपान कायदा तयार केला असून दि.१ जानेवारी, २०१४ पासून अंमलात आला आहे.

२. केंद्र शासनाच्या 'RFCTLARR Act, 2013' मध्ये सुधारणा करण्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राजपत्रात दि.२६.०४.२०१८ रोजी (मराठी व इंग्रजी - मध्ये) प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर अधिसूचना https://dgps.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. (सोबत प्रत जोडली आहे) सदर अधिसूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करावी.

३. उक्त सुधारणांमध्ये इतर काही सुधारणांबरोबरच नवीन भूसंपादन कायद्याच्या कलम २४ मधील पोट-कलम (२) मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. मा. न्यायालयात दाखल केलेल्या याचिका / दावे यांमध्ये सदर सुधारणा मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणण्याची दक्षता घेण्यात यावी. या सुधारणेमुळे भूसंपादन प्रकरणे व्यपगत होण्याची बाब निश्चितच टाळता येणे शक्य होणार आहे. तरी याबाबत दक्षतेने कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची ~~केलेली~~ प्रत शासनास पाठविण्यात यावी.

आपला,

( सुभाष कि.गावडे)
सह सचिव , महाराष्ट्र शासन

सोबत- अधिसूचना दि.२६.०४.२०१८
(मराठी व इंग्रजी)

प्रत,

१) सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.
२) कार्यासन अधिकारी, अ-१/अ-३/अ-४, महसूल व वन विभाग यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) निवडनस्ती (अ-२)

RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक २८(२)] गुरुवार, एप्रिल २६, २०१८/वैशाख ६, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.—**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | १-४ |

दिनांक १७ एप्रिल २०१८ रोजी माननीय राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.

(माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर “ **महाराष्ट्र शासन राजपत्रात**” दिनांक २६ एप्रिल २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई
२०१३ चा ३०. मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा

करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकोणसत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ असे म्हणावे.

सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मधील, पोट-कलम (२) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— २०१३ चा ३०.

" परंतु, तसेच, कलम १०क मध्ये सूचीबद्ध केलेले प्रकल्प आणि त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेली प्रयोजने यांसाठीच्या भूमिसंपादनास, या पोट-कलमाच्या पहिल्या परंतुकाच्या तरतुदींपासून सूट देण्यात येईल.".

सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० यामध्ये कलम १०क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमामध्ये, कलम १० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित प्रकल्पांना सूट देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

"**१०क.** राज्य शासनास, लोकहितास्तव, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रकरण दोन व प्रकरण तीन यांच्या तरतुदी लागू करण्यापासून पुढीलपैकी कोणत्याही प्रकल्पास सूट देता येईल :—

(क) संरक्षणासाठी उपाययोजना किंवा संरक्षणविषयक उत्पादन यांसह, राष्ट्रीय सुरक्षा किंवा भारताचे आणि त्याच्या प्रत्येक भागाचे संरक्षण या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असे प्रकल्प ;

(ख) सिंचन व विद्युतीकरण यांसह ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्प ;

(ग) गरीब लोकांसाठी परवडण्याजोगी घरे व गृहनिर्माण ;

(घ) राज्य शासनाने आणि त्याच्या उपक्रमांनी उभारलेले औद्योगिक क्षेत्र किंवा औद्योगिक वसाहत ;

(ङ) राज्य शासनाने आणि त्याच्या उपक्रमांनी उभारलेला औद्योगिक पट्टा (ज्यात अशा औद्योगिक पट्ट्यासाठी निर्देशित केलेल्या रेल्वे मार्गाच्या किंवा रस्त्यांच्या दोन्ही बाजूने एक किलोमीटरपर्यंत जमीन संपादित करण्यात येईल) ; आणि

(च) सार्वजनिक-खाजगी भागीदारीखालील प्रकल्पांसह पायाभूत सुविधा प्रकल्प, ज्यात जमिनीची मालकी राज्य शासनाकडे निहित असण्याचे चालू राहील :

परंतु, राज्य शासन, अधिसूचना काढण्यापूर्वी, अशा प्रकल्पासाठी निव्वळ आवश्यक असलेली किमान जमीन विचारात घेऊन, प्रस्तावित भूमिसंपादनासाठी जमिनीची व्याप्ती सुनिश्चिती करील.".

**४.** मुख्य अधिनियमामध्ये, कलम २३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० यामध्ये नवीन कलम २३क समाविष्ट करणे.

"**२३क.** (१) कलम २३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर जमिनीत हितसंबंध असलेल्या ज्या व्यक्ती जिल्हाधिकाऱ्यासमोर हजर झाल्या असतील अशा सर्व व्यक्तींनी, राज्य शासनाकडून करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या नमुन्यातील जिल्हाधिकाऱ्याच्या निवाड्यात समाविष्ट करावयाच्या बाबींसंबंधी लेखी संमती दिली असल्याबाबत, जिल्हाधिकाऱ्याची कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर, खात्री पटली असेल तर, त्यास, पुढील चौकशी न करता, अशा करारनाम्याच्या अटींनुसार निवाडा देता येईल. हितसंबंधित व्यक्तींनी करारनामा केला असल्यास जिल्हाधिकाऱ्यांने विनाचौकशी निवाडा देणे.

(२) पोट-कलम (१) खाली कोणत्याही जमिनीबद्दलच्या नुकसान भरपाईच्या निर्धारणामुळे या अधिनियमाच्या इतर तरतुदींनुसार, त्याच भागातील किंवा अन्य दुसऱ्या भागातील इतर जमिनी संबंधातील नुकसान भरपाईच्या निर्धारणास कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचणार नाही.

१९०८ चा १६. (३) नोंदणी अधिनियम, १९०८ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) खाली केलेला कोणताही करार, त्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यास पात्र नसेल.".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मधील पोट-कलम (२) मध्ये परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २४ ची सुधारणा.

" परंतु आणखी असे की, या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेला कालावधी मोजताना, कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही स्थगितीमुळे किंवा मनाईहुकूमामुळे ज्या कालावधीमध्ये किंवा कालावधींमध्ये भूमिसंपादनाची कार्यवाही रोखून धरण्यात आली होती असा कोणताही कालावधी किंवा असे कोणतेही कालावधी, किंवा ताबा घेण्यासाठी न्यायाधिकरणाच्या निवाड्यामध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी, किंवा जेथे ताबा घेण्यात आला असेल परंतु भूमिसंपादन अधिनियम, १८९४ याच्या कलम १२ च्या पोट-कलम (२) खालील निवाड्याची नोटीस प्राप्त झालेली असताना सुद्धा नुकसानभरपाई स्वीकारण्यास नकार दिल्यामुळे किंवा नुकसानभरपाई घेण्यासाठी कोणीही पुढे न आल्यामुळे न्यायालयात किंवा या प्रयोजनासाठी उघडण्यात आलेल्या कोणत्याही नामनिर्देशित खात्यात ज्या कालावधीपर्यंत नुकसानभरपाई जमा केलेली असेल असा कालावधी, वगळण्यात येईल. तसेच, संपादन करणाऱ्या संस्थेच्या नावाने निवाडा देण्यात आल्यानंतर तीन वर्षांच्या आत, जर उक्त जमिनीचा फेरफार करण्यात आला असेल तेव्हा, तिचा ताबा घेण्यात आला आहे असे मानण्यात येईल.". (१८९४ चा १.)

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० यामध्ये नवीन कलम ३१क समाविष्ट करणे.

"**३१क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा जेव्हा राज्य शासनास स्वतःच्या वापरासाठी शंभर एकरांहून कमी नसेल इतकी जमीन संपादित करावयाची असेल किंवा जेव्हा जेव्हा कलम १० च्या पोट-कलम (४) च्या परंतुकामध्ये निर्दिष्ट केलेल्या एकरेषीय स्वरुपाच्या प्रकल्पांच्या बाबतीत जमीन संपादित करावयाची असेल तेव्हा तेव्हा, बाधित कुटुंबांना कलम २७ अन्वये निर्धारित केलेल्या नुकसान-भरपाईच्या रकमेच्या पन्नास टक्के एवढी ठोक रक्कम पुनर्वसन व पुनर्वसाहत मूल्य म्हणून प्रदान करण्यासाठी राज्य शासन सक्षम असेल.". राज्य शासनाने त्याच्या एकरेषीय स्वरूपाच्या प्रकल्पांसाठी ठोक रकमेचे प्रदान करणे.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४० मधील, पोट-कलम (२) मध्ये, " संसदेच्या मान्यतेने " या मजकुरानंतर, "किंवा केंद्र सरकारने राज्य शासनाला दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्याकरिता " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल. सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४० ची सुधारणा.

सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम ४६ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४६ मधील, पोट-कलम (६) मध्ये, स्पष्टीकरणातील खंड (ख) मधील उप-खंड (एक) व (दोन) वगळण्यात येतील.

सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० यामध्ये कलम ८७ बदलीदाखल करणे.

**९.** मुख्य अधिनियमामध्ये कलम ८७ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

शासकीय अधिकाऱ्यांनी केलेले अपराध.

"**८७.** या अधिनियमाखालील कोणताही अपराध घडला त्यावेळी, जी व्यक्ती केंद्र सरकारच्या किंवा, यथास्थिति, राज्य शासनाच्या सेवेत आहे किंवा होती अशा कोणत्याही व्यक्तीने असा अभिकथित अपराध केलेला असेल त्याबाबतीत, न्यायालय अशा कोणत्याही अपराधाची दखल घेईल, परंतु फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १९७ मध्ये निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण करण्यात येईल.". १९७४ चा २.

सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० यामध्ये नवीन कलम १०५क समाविष्ट करणे.

**१०.** मुख्य अधिनियमामध्ये कलम १०५ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

या अधिनियमाच्या तरतुदी, विवक्षित महाराष्ट्र अधिनियमांना लागू नसणे किंवा त्या विवक्षित फेरबदलांसह लागू असणे.

"**१०५-क.** (१) पोट-कलम (२) च्या अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींखालील जमिनींच्या संपादनास लागू नसतील.

(२) राज्य शासनास, अधिसूचनेद्वारे, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०१८ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत, असा निदेश देता येईल की, पहिल्या अनुसूचीनुसार नुकसानभरपाईचे निर्धारण करणे आणि दुसऱ्या व तिसऱ्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पुनर्वसन व पुनर्वसाहत यांच्याशी संबंधित या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी ह्या बाधित कुटुंबांना लाभकारी असल्याने, पाचव्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींखालील भूमि संपादनाच्या प्रकरणांना लागू होतील, किंवा, यथास्थिति, ज्यामुळे नुकसान भरपाई कमी होणार नाही किंवा नुकसानभरपाई, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत यांच्याशी संबंधित असलेल्या या अधिनियमाच्या तरतुदींचे सौम्यीकरण होणार नाही अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा फेरबदलांसह किंवा अपवादांसह लागू होतील : २०१८ चा महा. ३७

परंतु, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी ठराव संमत केल्याखेरीज अशी कोणतीही अधिसूचना काढण्यात येणार नाही.

सन २०१३ चा अधिनियम क्रमांक ३० यामध्ये पाचवी अनुसूची जादा दाखल करणे.

**११.** मुख्य अधिनियमाच्या चौथ्या अनुसूचीनंतर, पुढील अनुसूची जादा दाखल करण्यात येईल :—

**" पाचवी अनुसूची**

(कलम १०५-क पहा)

**महाराष्ट्र राज्यातील भूमि संपादनाचे विनियमन करणाऱ्या महाराष्ट्र अधिनियमितींची सूची.**

१. महाराष्ट्र महामार्ग अधिनियम (१९५५ चा ५५).

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ३).

३. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७).

४. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ (१९७७ चा महा. २८).".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक ३४(२)] गुरुवार, एप्रिल २६, २०१८/वैशाख ६, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये २७.००

### असाधारण क्रमांक ७४

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (*3*) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra Amendment) Act, 2018 (Mah. Act. No. XXXVII of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXVII of 2018.

*(First published, after having received the assent of the President in the "Maharashtra Government Gazette", on the 26th April 2018).*

An Act further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, in its application to the State of Maharashtra.

WHEREAS, it is expedient further to amend the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, in its application to the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixty-ninth Year of the Republic of India as follows :— (30 of 2013.)

**1.** This Act may be called the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra Amendment) Act, 2018. Short title.

Amendment of section 2 of Act 30 of 2013.

**2.** In section 2 of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013, in its application to the State of Maharashtra (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*2*), after the second proviso, the following proviso shall be added, namely :— 30 of 2013.

" Provided also that, the acquisition of land for the projects listed in section 10A and the purposes specified therein, shall be exempted from the provisions of the first proviso to this sub-section.".

Insertion of a new section 10A in Act 30 of 2013.

**3.** After section 10 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Power of State Government to exempt certain projects.

"**10A.** The State Government may, in the public interest, by notification in the *Official Gazette,* exempt any of the following projects from the application of the provisions of Chapter II and Chapter III of this Act, namely :—

(*a*) such projects vital to national security or defence of India and every part thereof, including preparation for defence or defence production ;

(*b*) rural infrastructure including irrigation and electrification ;

(*c*) affordable housing and housing for the poor people ;

(*d*) industrial area or industrial estate set up by the State Government and its undertaking ;

(*e*) industrial corridor set up by the State Government and its undertaking (in which case the land shall be acquired up to one kilometre on both sides of designated railway line or roads for such industrial corridor) ; and

(*f*) infrastructure projects including projects under public-private partnership where the ownership of land continues to vest with the Government :

Provided that, the State Government shall, before issue of notification, ensure the extent of land for the proposed acquisition keeping in view the bare minimum land required for such project.

Insertion of a new section 23A in Act 30 of 2013.

**4.** After section 23 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Award of Collector without enquiry in case of agreement of interested persons.

" **23A.** (*1*) Notwithstanding anything contained in section 23, if at any stage of the proceedings, the Collector is satisfied that all the persons interested in the land who appeared before him have agreed in writing on the matters to be included in the award of the Collector in the form prescribed by rules made by the State Government, he may, without making further enquiry, make an award according to the terms of such agreement.

(*2*) The determination of compensation for any land under sub-section (*1*) shall not in any way affect the determination of compensation in respect of other lands in the same locality or elsewhere in accordance with the other provisions of this Act.

16 of 1908. (*3*) Notwithstanding anything contained in the Registration Act, 1908, no agreement made under sub-section (*1*) shall be liable to registration under that Act.".

Amendment of section 24 of Act 30 of 2013.

**5.** In section 24 of the principal Act, in sub-section (*2*), after the proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided further that, in computing the period referred to in this sub-section, any period or periods during which the proceedings for acquisition of the land were held up on account of any stay or injunction issued by any court or the period specified in the award of a Tribunal for taking possession or such period where possession has been taken but the compensation is lying deposited in a court or in any designated account maintained for this purpose on account of refusal or not coming forward for receiving compensation despite receipt of such notice under sub-section (*2*) of section 12 of the Land Acquisition Act, 1894, shall be excluded. Also if the said land is mutated within three years after passing the award in the name of acquiring body, it shall be deemed that the possession of the land has been taken.". (I of 1894.)

Insertion of a new section 31A in Act 30 of 2013.

**6.** After section 31 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Payment of lump sum amount by State Government for its linear nature projects.

" **31A.** Notwithstanding anything contained in this Act, it shall be competent for the State Government to pay, whenever the land is to be aquired for its own use amounting to less than one hundred acres or whenever the land is to be acquired in case of projects which are linear in nature as referred to the proviso to sub-section (*4*) of section 10, as Rehabilitation and Resettlement cost, such lump sum amount equal to fifty per cent. of the amount of compensation as determined under section 27 to the affected families.".

Amendment of section 40 of Act 30 of 2013.

**7.** In section 40 of the principal Act, in sub-section *(2),* after the words "approval of Parliament", the words "or to comply with the directions given by the Central Government to the State Government" shall be added.

Amendment of section 46 of Act 30 of 2013.

**8.** In section 46 of the principal Act, in sub-section *(6),* in the *Explanation,* in clause *(b),* sub-clauses *(i)* and *(ii)* shall be deleted.

Substitution of section 87 of Act 30 of 2013.

**9.** For section 87 of the principal Act, the following section shall be substituted, namely :—

Offences by Government Officials.

"**87.** Where any offence under this Act has been committed by any person who is or was employed in the Central Government or the State Government, as the case may be, at the time of commission of such alleged offence, the court shall take cognizance of such offence provided the procedure laid down in section 197 of the Code of Criminal Procedure, 1973, in its application to the State of Maharashtra, is followed.". (2 of 1974.)

Insertion of a new section 105A in Act 30 of 2013.

**10.** After section 105 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Provisions of this Act not to apply to certain Maharashtra Acts or to apply with certain modifications.

"**105-A.** (*1*) Subject to sub-section (*2*), the provisions of this Act shall not apply to acquisition of land under the enactments specified in the Fifth Schedule.

(*2*) The State Government may, by notification, within one year from the date of commencement of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement (Maharashtra Amendment) Act, 2018, direct that any of the provisions of this Act, relating to the determination of compensation in accordance with the First Schedule and rehabilitation and resettlement specified in the Second and Third Schedules, being beneficial to the affected families, shall apply to the cases of land acquisition under the enactments specified in the Fifth Schedule or shall apply with such exceptions or modifications that do not reduce the compensation or dilute the provisions of this Act relating to the compensation, rehabilitation and resettlement as may be specified in the notification, as the case may be : Mah. XXXVII of 2018.

Provided that, no such notification shall be issued except on a resolution passed by both Houses of the State Legislature.".

Addition of FIFTH SCHEDULE in Act 30 of 2013.

**11.** After the Fourth Schedule to the principal Act, the following Schedule shall be added, namely :—

" *THE FIFTH SCHEDULE*

(*See* section 105-A)

LIST OF MAHARASHTRA ENACTMENTS REGULATING LAND ACQUISITION IN THE STATE OF MAHARASHTRA

1. The Maharashtra Highways Act (LV of 1955).
2. The Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah. III of 1962).
3. The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966).
4. The Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (Mah. XXVIII of 1977)."

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.